# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 01/07/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## कळमेश्वर परिसरात अवैधरित्या जुगार अड्डयावर धाड
## रोख रक्कम 88,150/– रू. सह एकुण 18,99,950 रू चा मुद्देमाल जप्त
## 10 जुगारूना अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 01/08/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोस्ट कळमेश्वर हद्दीत पथक पेट्रोलींग करीत असता गुप्त माहितीगाराकडुन खबर मिळाली की, कळमेश्वर बायपास रोडवरील इंडियन पेट्रोलपंप जवळ सार्वजनिक ठिकाणी काही जुगारू 52 तास पत्यावर पैश्याची बाजी लावुन पैसे हारजितचा जुगार खेळत असल्याच्या खात्रीशीर माहितीवरून धाड टाकुन जुगारू नामे 1)विशाल विजयराव भांगे रा. कळंबी, 2) नकुल राजु मुंडवाईक, कळमेश्वर, 3) नरेश राधेश्याम भुरे रा. ब्राम्हणी, 4) अश्विन मनोज भुंबरकर रा. कळमेश्वर, 5) आकाश दिपक बादलवार रा. कळमेश्वर, 6) शैलेश लोकेश वानखेडे रा. ब्राम्हणी कळमेश्वर 7) राहुल सुरेश रहाटे रा. कळमेश्वर, 8) रितेश उमाकांत लेकुरवाडे रा. कळमेश्वर, 9) निकुंज अशोक कसागराव रा. कळमेश्वर 10) अमजद खान इस्माईल खान पठाण रा. कळमेश्वर एकुण 10 जुगारूंना जुगार खेळतांनी रंगेहात ताब्यात घेण्यात आले. त्यांचे ताब्यातुन एकुण 88,150/– रू रोख रक्कमेसह 12 मोबाईल संच, 01 चारचाकी वाहन व 03 दुचाकी वाहन असा एकुण 18,99,950/– रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोस्टे कळमेश्वर येथे अप. क्र. 483/20 कलम 12 महाराष्ट्र जुगार कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. फौजदार जयप्रकाश शर्मा, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नायक सुरेश गाते, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, महेश बिसने, चालक अमोल कुथे यांनी पार पाडली.



# अपघात

पोलिस स्टेशन बेला हद्दीत मानस अग्रो प्रायव्हेट लिमिटेड मध्ये दुपारी दोनच्या सुमारास युनिट क्रमांक 1 मध्ये मोल्यासिस टॅंक मध्ये गॅस तयार होऊन स्फोट होऊन पाच जणांचा बळी गेला. मृतकांची नावे– वेल्डर सचिन प्रकाश वाघमारे वय 24 वर्ष, हेल्पर मंगेश प्रभाकर नौकरकर, वय 21 वर्षे, हेल्पर वासुदेव विठ्ठल लडी, वय 30 वर्ष, हेल्पर प्रफुल पांडुरंग मुन वय 25 वर्ष, हेलपर लिलाधर वामनराव शेंडे, वय 42 वर्ष, सर्व रा. वडगाव यांचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधीकारी नागपूर श्री. आर एस. चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिटटावार व ठाणेदार पो.स्टे. बेला श्री. शिवाजी भाडंवलकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर